कार्यालय आदेश क्र. ९६०१

पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.
सहव्यवस्थापकीय संचालक कार्यालय
दिनांक : - ०२/११/२०२२

संदर्भः-मे.महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०१८/प्र.क्र.४५/कार्या-६ मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय मुंबई-४०० ०३२ दिनांक २६/११/२०१८

संदर्भाकिंत शासन परिपत्रकानुसार शासकीय कामात अधिक पारदर्शकता येण्यासाठी व माहिती अधिकार अधिनियत अंतर्गत प्राप्त माहिती अर्जांची, प्रथम व व्दित्तीय अपिलांची संख्या कमी होण्याच्या दृष्टीने पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या कार्यालयात व आगारामध्ये प्रत्येक दर सोमवारी किंवा सदर दिवशी सार्वजनिक सुट्टी असल्यास त्यांनतरच्या कार्यालयीन दिवशी दुपारी ३ ते ५ या वेळेत नागरिकांना माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत विहित प्रक्रियेनुसार, त्यांच्या मागणीनुसार अभिलेख अवलोकनासाठी उपलब्ध करून द्यावेत.

तसेच महामंडळातील सर्व जनमाहिती अधिकारी यांनी केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार प्राप्त अर्जांची माहिती अर्ज प्राप्त दिनांकापासुन विहित मुदतीत (३० दिवसात) अर्जदार यांना देण्याचे करावे व प्रथम अपिल अर्ज प्राप्त झाल्यावर सदरचा अपिल अर्ज संबंधित अपिलीय अधिकारी यांच्या निदर्शनास आणुन द्यावयाचा असून त्याबाबतची पुढील कार्यालयीन कार्यवाही त्वरीत करावयाची आहे. यामध्ये विहित मुदतीत याबाबतची कार्यवाही होईल याची योग्य ती दक्षता सर्व संबंधितांनी घ्यावी.

2/11/2022

सहव्यवस्थापकीय संचालक
पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

प्रतः-
सर्व खाते प्रमुख,
सर्व विभाग प्रमुख
सर्व आगार व्यवस्थापक
सर्व डीएमई
आय.टी.विभाग,

Scanned with CamSca